क्र. १४० पहिले वर्ष

# रविवारची उपासना

१६ एप्रिल २०२३

## पुनरूत्थानानंतरचा दुसरा रविवार

### प्रस्तावना

प्रभू ख्रिस्ताने शिष्यांना दर्शन दिले हे जेव्हा कोणाच्या? सहकारी शिष्याने सांगितले तेव्हा कोणी विश्वास ठेवला नाही. ख्रिस्ताला प्रत्यक्ष पाहिल्याशिवाय व त्याच्या कुशीत हात घातल्याशिवाय मी विश्वास ठेवणार नाही असे प्रेषित थॉमस म्हणाला, तेव्हा ख्रिस्ताने थॉमसला दर्शन दिले आणि त्यास म्हणाला, ''विश्वासहीन असू नकोस तर विश्वास ठेवणारा हो.'' प्रत्यक्ष येशूला पाहताच त्याने ''माझ्या देवा, माझ्या स्वामी'' ह्या विश्वासाची प्रांजळ कबूली दिली तेव्हा ख्रिस्त म्हणाला, ''पाहिल्यावाचून विश्वास ठेवणारे ते धन्य.'' ख्रिस्ताच्या पुनरुत्थानाविषयी आपल्याही मनात शंका निर्माण झाली असेल तर ख्रिस्ताच्या पुनरुत्थानावर आपला विश्वास बळकट करण्यासाठी कृपा मागू या. आज ख्रिस्तसभा दैवी करुणेचा रविवार साजरा करीत आहे. प्रभू येशू दयेचा व करुणेचा महासागर आहे. त्याच्या ह्रदयातून दयावंत कृपेचा झरा वाहत असतो. त्याच्या दयेची, प्रेमाची व शांतीची कृपा आपणांस लाभावी म्हणून आपण ह्या मिस्साबलीमध्ये विशेष प्रार्थना करूया.

### प्रास्ताविक प्रार्थना

**आपण प्रार्थना करूया**

हे दयाळू परमेश्वरा, तू पाण्याने आमची पापे धुवून काढतोस, पवित्र आत्म्याने आम्हाला नवजन्म देतोस व ख्रिस्ताच्या रक्ताने आमचे तारण करतोस, ख्रिस्ताच्या पुनरुत्थानाची स्मृती साजरी करीत असता आम्हाला या वरदानाची जाणीव करून दे आणि तुझ्या जीवनदायी कृपादानाचे आम्हामध्ये नूतनीकरण घडवून आण. ही प्रार्थना आम्ही, तुझ्याबरोबर पवित्र आत्म्याच्या ऐक्यात सर्वकाळ जिवंत राहणारा व राज्य करणारा, एकच परमेश्वर, तुझा पुत्र, आमचा प्रभू येशू ख्रिस्त ह्याच्याद्वारे करतो.

प्रभूशब्द विधी

### पहिले वाचन

**प्रेषितांची कृत्ये या पुस्तकातून घेतलेले वाचन २:४२–४७**

**''सर्व श्रध्दावंतांची एकी होती आणि त्यांचे सर्वकाही सामाईक होते.''**

ते नवख्रिस्ती प्रेषितांच्या शिक्षणात आणि सहवासात, भाकर मोडण्यात आणि प्रार्थना करण्यात तत्पर असत. तेव्हा प्रत्येक मनुष्याला भय वाटले आणि प्रेषितांच्या हातून पुष्कळ अद्भुत कृत्ये व चिन्हे घडत होती. तेव्हा सर्व श्रध्दावंतांची एकी होती आणि त्यांचे सर्व काही सामाईक होते. ते आपापली जमीन व मालमत्ता विकून प्रत्येकाच्या गरजेनुसार सर्वांना वाटून देत असत. ते दररोज एकचित्ताने व तत्परतेने मंदिरात जमत असत. घरोघरी भाकर मोडत असत आणि देवाची स्तुती करीत हर्षाने व सालस मनाने अन्न खात असत. सर्व लोक त्यांच्यावर प्रसन्न होते आणि प्रभू तारण प्राप्त असलेल्या माणसांची दररोज त्यांच्यात भर घालीत होता.

**हा प्रभूचा शब्द आहे**

### प्रतिसाद स्तोत्र

११७:२–४,१३–१५,२२–२४

प्रतिसाद : **परमेश्वराचे उपकारस्मरण करा.**

१. कारण तो चांगला आहे, ''त्याची दया
सनातन आहे.''इस्राएलाने म्हणावे,
''त्याची दया सनातन आहे.''
अहरोनच्या माणसाने म्हणावे,
''त्याची दया सनातन आहे.''
देवाला भिणाऱ्यांनी म्हणावे,
''त्याची दया सनातन आहे.''

२. मी पडावे म्हणून मला जोराने धक्का दिला
पण परमेश्वराने मला सावरले.
परमेश्वर माझे बल आणि माझा स्तोत्रविषय
आहे. तो माझा उध्दारक झाला आहे.
उत्सवाचा व विजयाचा शब्द धार्मिकांच्या
वस्तीत आहे.

३. बांधणाऱ्यांनी नापसंत केलेला दगड
कोनशिला झाला आहे. ही परमेश्वराची
करणी आहे, तो आमच्या दृष्टीने अद्भुत
आहे. प्रभूचा हा दिवस आहे, ह्या दिवशी
आपण उल्हास व आनंद करू या.

### दुसरे वाचन

**पेत्रचे पहिले पत्र यातून घेतलेले वाचन १:३–९**

**''पित्याने आपल्या महादयेनुसार येशू ख्रिस्ताला मृतातून पुनरुत्थित करून आम्हांला नवीन जन्म दिला आहे.''**

आपल्या प्रभू येशू ख्रिस्ताचा देव व पिता धन्यवादित असो! जिवंत आशा प्राप्त होण्यासाठी आणि अविनाशी निर्मळ व अक्षय वतन मिळण्यासाठी, त्याने आपल्या महादयेनुसार येशू ख्रिस्ताच्या मरणातून पुनरुत्थानाच्याद्वारे आम्हांला पुन्हा जन्म दिला. शेवटच्या काळी प्रगट होण्यास सिध्द असलेले तारण प्राप्त व्हावे म्हणून देवाची शक्ती तुमचे रक्षण करते. तुम्हांसाठी ते वतन स्वर्गात राखून ठेवले आहे. त्याविषयी तुम्ही उल्हास करीत असला तरी काही काळ तुम्हांला विविध संकटे सोसावी लागतील, यासाठी की, अग्नीने परीक्षा करण्यात येणाऱ्या सोन्यापेक्षा अधिक मौल्यवान अशी तुमच्या श्रध्देची फळे येशू ख्रिस्ताच्या प्रकट होण्याच्यावेळी प्रशंसा, गौरव व मान यांस कारणीभूत व्हावी. त्याला पाहिले नसताही त्याच्यावर तुम्ही प्रेम करता, आता तो दिवस नसता त्याच्यावर श्रध्दा ठेवता आणि त्या श्रध्देचे पर्यवसान जे आपल्या जिवांचे तारण ते उपभोगीत अनिर्वाच्य गौरवयुक्त आनंदाने उल्हासता.

**हा प्रभूचा शब्द आहे**

### जयघोष

**योहान २०:२९**

**आलेलुया, आलेलुया!**

येशूने थोमाला म्हटले, ''तू मला पाहिले आहे
म्हणून श्रध्दा ठेवली आहे. पाहिल्यावाचून श्रध्दा ठेवणारे ते धन्य.''

**आलेलुया!**

### शुभवर्तमान

**योहानलिखित शुभवर्तमानातून घेतलेले वाचन**

**२०:१९–३१**

**''आठ दिवसानंतर येशू आला.''**

आठवड्याच्या पहिल्या दिवशी संध्याकाळी जेथे शिष्य होते तेथील दारे यहूद्यांच्या भीतीमुळे बंद असता, येशू आला आणि मध्ये उभा राहून म्हणाला, ''तुम्हांस शांती असो.'' असे बोलून त्याने आपले हात व कूस त्यांना दाखवली. तेव्हा प्रभूला पाहून शिष्यांना आनंद झाला. येशू पुन्हा त्यांना म्हणाला, ''तुम्हास शांती असो. जसे पित्याने मला पाठवले आहे

तसे मीही तुम्हांला पाठवतो.'' असे बोलून त्याने त्यांच्यावर फुंकर घातली आणि त्यांना म्हटले, ''पवित्र आत्म्याचा स्वीकार करा. ज्या कोणच्या पापांची तुम्ही क्षमा करता त्यांची क्षमा झाली आहे आणि ज्या कोणाची तुम्ही तशीच ठेवता ती तशीच ठेवता ती तशीच ठेवलेली आहेत.''

येशू आला तेव्हा बारातील एक म्हणजे दिदुम म्हटलेला थोमा हा त्यांच्याबरोबर नव्हता. म्हणून दुसऱ्या शिष्यांनी त्याला सांगितले, ''आम्ही प्रभूला पाहिले.'' पण त्याने म्हटले, ''त्याच्या हातात खिळ्यांचे व्रण पाहिल्यावाचून, खिळे होते त्या जागी आपले बोट घातल्यावाचून आणि त्याच्या कुशीत आपला हात घातल्यावाचून मी विश्वास धरणारच नाही.''

मग आठ दिवसानंतर त्याचे शिष्य पुन्हा एकदा आत असता त्यांच्याबरोबर थोमा होता. तेव्हा दारे बंद असताना येशू आला व मध्ये उभा राहून म्हणाला, ''तुम्हास शांती असो.'' नंतर त्याने थोमाला म्हटले, ''तू आपले बोट इकडे कर आणि माझे हात पाहा व आपला हात पुढे करून माझ्या कुशीत घाल आणि विश्वासहीन असू नको, तर विश्वास ठेवणारा ऐस.'' थोमाने त्याला म्हटले, ''माझा प्रभू व माझा देव!'' येशूने त्याला म्हटले, ''तू मला पाहिले आहे म्हणून विश्वास ठेवला आहे; पाहिल्यावाचून विश्वास ठेवणारे ते धन्य!''

या पुस्तकात लिहिली नाहीत अशी दुसरीही पुष्कळ चिन्हे येशूने आपल्या शिष्यांदेखत केली. येशू हा देवाचा पुत्र ख्रिस्त आहे असा तुम्ही विश्वास ठेवावा आणि विश्वास ठेवून तुम्हांला त्याच्या नावाने जीवन प्राप्त व्हावे, म्हणून ही लिहिली आहेत.

**प्रभूचे हे शुभवर्तमान**

## श्रध्दावंतांच्या प्रार्थना

**प्रास्ताविक**

माझ्या बंधुभगिनींनो, ख्रिस्ताच्या पुनरुत्थानाच्या आनंदासह आपण आपल्या परमेश्वरपित्याकडे प्रार्थना करू या. त्याच्या अतिप्रिय पुत्राच्या प्रार्थना त्याने ऐकल्या आणि स्वीकारल्या : तो आपल्या मागण्या पूर्ण करील असा आपण विश्वास बाळगू या.

आपला प्रतिसाद असेल – **मंगल आत्म्या, हे भगवान, मला श्रद्धेचे दे वरदान.(गायनात)**

१. ख्रिस्ताच्या पुनरुत्थानावर विश्वास ठेवून श्रद्धेने समर्पित जीवन जगणारे आपले पोप, कार्डिनल्स, बिशप्स, धर्मगुरू, सिस्टर्स व ब्रदर्स ह्यांना परमेश्वराने अंधारात असलेल्यांना ख्रिस्ताचा प्रकाश देण्यास कृपा द्यावी म्हणून आपण प्रार्थना करूया.

२. आपल्या सर्वांना शारिरीक आणि मानसिक विचारांपासून मुक्त करून त्याच्या प्रेमाची ज्योत आपल्या अंत:करणात नेहमी पेटती ठेवण्यास कृपा मिळावी म्हणून आपण प्रार्थना करूया.

३. प्रभू ख्रिस्ताच्या देवराज्याची सुवार्ता पसरविण्यासाठी देव सामान्य जनांमधून अनेकांची निवड करतो. रंजल्यागांजलेल्यांची सेवा करण्यास व ख्रिस्ताच्या कार्याचे सहभागीदार होण्यास आपणांस कृपा मिळावी म्हणून आपण प्रार्थना करूया.

४. आपल्या देशाचा कारभार सांभाळण्यासाठी जे राज्यकर्ते नेमले गेले आहेत त्यांना, विशेषकरून आपले राष्ट्रपती, उपराष्ट्रपती, पंतप्रधान व मंत्रीमंडळाचे सदस्य यांना प्रभूचे विशेष मार्गदर्शन लाभावे, म्हणून आपण प्रार्थना करूया.

५. आपल्या कौटुंबिक व वैयक्तिक हेतूंसाठी आपण प्रभूकडे प्रार्थना करूया.

## समारोप

हे स्वर्गीय पित्या, तुझ्या लोकांच्या या जीवनातील अनेक गरजांची तुला जाणीव आहे. तुझ्यावर विश्वास ठेवणाऱ्या सर्वांच्या प्रार्थना ऐक आणि त्यांचा स्विकार कर. ही प्रार्थना आम्ही आमच्या प्रभू ख्रिस्ताद्वारे करतो. आमेन.

## अर्पणावरील प्रार्थना

हे प्रभो, श्रध्दा व स्नानसंस्कार यामुळे आमची नवनिर्मिती झाली आहे. तुझ्या प्रजाजनांच्या (व स्नानसंस्काराठायी नवजन्म घेतलेल्या लोकांच्या) भेटींचा स्विकार कर आणि सार्वकालिक आनंदाचे आम्हाला वरदान दे. ही प्रार्थना आम्ही आमच्या प्रभूख्रिस्ताद्वारे करतो.

## प्रसादानंतर प्रार्थना

हे सर्वसमर्थ परमेश्वरा, पुनरुत्थानसंस्काराचा आम्ही स्वीकार केला आहे. हा संस्कार आम्हाला नवजीवनाचे वरदान मिळवून देवो. ही प्रार्थना आम्ही आमच्या प्रभूख्रिस्ताद्वारे करतो.

## चिंतन

पहिल्या वाचनात (प्रे.कृ.२:४२-४७) नमूद करण्यात आलेला सामुदायिक जीवनातील आनंद आणि दुसऱ्या वाचनात (१ पेत्र.१:३-९) नमूद करण्यात आलेले सार्वकालिक जीवनाचे वरदान या व्यतिरिक्त आजचे शुभवर्तमान (योहान २०:१९-३१) पुनरुत्थित प्रभूच्या आगमनाने व्यक्तीच्या जीवनात दिसून येणारे पाच बदल सादर करते :

**अ) भीतीच्या जागी आनंद :** यहुद्यांच्या भीतीमुळे दारे बंद करून शिष्य एका खोलीत लपून बसले होते. प्रभूला पाहून त्यांना आनंद झाला.

**ब) अस्वस्थतेच्या जागी शांती :** येशूच्या मृत्यूनंतर तिसरा दिवस मावळण्याची वेळ जवळ आलेली असल्याने शिष्य अस्वस्थ झालेले होते. येशूच्या आगमनाने त्यांना शांतीचा अनुभव आला. 'तुम्हांस शांती असो' हे केवळ अभिवादन किंवा अभिष्टचिंतन ह्यांचे प्रतीक नसून भर रणांगणातून पळून गेलेल्या शिष्यांबरोबर येशूने केलेल्या समेटाचे ते प्रतीक होते.

**क) एकाकीपणाच्या जागी पवित्र आत्म्याचा सहवास :** 'मी तुम्हाला अनाथ सोडणार नाही' ह्या आपल्या वचनाला जागून येशू आपल्या प्रेषितांवर फुंकर घालून त्यांना पवित्र आत्म्याचे दान देतो.

**ड) निष्क्रियतेच्या जागी मिशनकार्याची जाणीव :** येशूने शिष्यांना प्रेषितीय कामगिरीवर जाण्याची सूचना यापूर्वीही दिलेली होती. मात्र ती अव्हेरून ते निष्क्रियपणे एका बंद खोलीत बसलेले होते. आत्ता येशू नव्याने त्यांना सांगतो, ''जसे पित्याने मला पाठविले आहे तसे मी तुम्हांला पाठवितो.''

**इ) सूडाच्या जागी क्षमाशीलता :** येशूच्या दु:खसहनाच्या प्रकियेत शिष्यांच्या मनात यहुदी अधिकाऱ्यांविरूध्द व रोमी प्रशासनाविरूध्द किंबहुना परस्परांविरूध्द सूडभावना उत्पन्न झाल्याची शक्यता होती. येशू आता त्यांना क्षमाशीलतेची मनोवृत्ती धारण करण्याचे आवाहन करतो.

**आत्मपरीक्षण :** प्रभूच्या पुनरुत्थानामुळे मला वरीलपैकी कोणते दान मिळाले आहे? अजून मला कोणते वरदान हवे आहे?

●●●

| एप्रिल २०२३ | बायबल वाचने | | दुसरा सप्ताह |
|---|---|---|---|
| सोम १७ | सं बेनेडिक्ट जो लाब (पां) | : प्रे.कृ.४:२३-३१/योहान ३:१-८ | |
| मंगळ १८ | सं गाल्डिनुस (पां) | : प्रे.कृ. ४:३२-३७/योहान ३:७-१५ | |
| बुध १९ | सं लिओ नवव (पां) | : प्रे. कृ. ५:१७-२६/योहान ३:१६-२१ | |
| गुरु २० | मॉन्तेपुल्शिआनोची सं आग्नेस (पां) | : प्रे.कृ. ५:२७-३३/ योहान ३:३१- ३६ | |
| शुक्र २१ | सं कॉनरेड (पां) | : प्रे. कृ. ५:३४-४२/योहान ६:१- १५ | |
| शनि २२ | सं आन्सेलम (पां) | : प्रे. कृ.६:१-७/योहान ६:१६-२१ | |